MHPU180008292014

नियमित दिवाणी दावा/१२७/२०१४
**हनुमंत भगवान होले वि.. भिवा शिवराम चोरमले**

## <u>निशाणी क्रमांक १५३ वरील आदेश</u>
(पारीत दिनांक २०/०६/२०२६)

०१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.३ सखुबाई उर्फ कामाबाई सिदु शिंगटे यांचे वारस अभिलेखावर घेण्याकामी आणि त्या अनुषंगे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याकामी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी अर्जास म्हणणे दाखल करुन हरकत नोंदवली.

०२. वादी यांच्या कथनाप्रमाणे दाव्यातील प्रतिवादी क्र.३ सखुबाई उर्फ कामाबाई सिदु शिंगटे यांचे दिनांक ०५/१२/२०२२ रोजी निधन झाले आहे. अर्जामध्ये नमूद केल्यानुसार प्रतिवादी क्र.३ सखुबाई उर्फ कामाबाई सिदु शिंगटे यांना वारस असून त्यांच्या विरुध्द दाव्यास कारण पुढे चालू आहे, त्यामुळे वारस अभिलेखावर घेऊन त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी अर्जास म्हणणे दाखल करुन हरकत नोंदवली व अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०३. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अर्ज व अभिलेखाची पाहणी केली. अर्जदार यांनी अभिलेखावर दाखल केलेले नि.क्र. १२८ सोबतचे मृत्युप्रमाणपत्रावरुन प्रतिवादी क्र.३ सखुबाई उर्फ कामाबाई सिदु शिंगटे यांचे दिनांक ०५/१२/२०२२ रोजी निधन झाल्याचे सिध्द होते. अबेटमेंट सेट असाईड अर्ज व विलंब माफीचा अर्ज यापुर्वी खर्चासह मंजूर करण्यात आलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज हा शपथेवर दाखल करण्यात आलेला आहे. अर्जामध्ये नमूद केलेल्या प्रतिवादी क्र.३ यांच्या वारसांविरुध्द दाव्यास कारण पुढे चालू राहिल्याने त्यांना प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस म्हणून सामील करणे न्यायोचीत ठरते, त्यामुळे वारसांना मयत प्रतिवादी क्र.३ यांचे वारस म्हणुन अभिलेखावर घेण्यास आणि त्याअनुषंगे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास

परवानगी देणे न्यायोचीत ठरते, त्यावरुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

०१. अर्जदार यांचा नि.क्र. १५३ लगतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. वादी यांना अर्जामध्ये नमूद प्रतिवादी क्र.३ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास आणि त्या अनुषंगाने दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते.

०३. वादी यांनी दाव्यातील मयत प्रतिवादी क्र.३ यांचे वारसांच्या अनुषंगाने दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करावी आणि अभिलेखावर दुरुस्त प्रत दाखल करावी.

०४. दोन्ही पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

Digitally signed by AARISH SAIFODDIN SHAIKH
Date: 2026.06.20 16:58:24 +0530

दिनांक– २०/०६/२०२६.

**(ए. एस. शेख)**
४ थे सह दिवाणी न्यायाधीश,
क. स्तर, दौंड, जि. पुणे.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file, Order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | Deepak A. Merukar, Grade-3 |
| Court / Panel | :- | A. S. Shaikh<br>4th Jt. C.J.J.D. & Judicial Magistrate First Class (Court No. 4) Daund. |
| Order / Judgment date | :- | 20/06/2026. |
| Order / Judgment singed by the Presiding Officer on | :- | 20/06/2026. |
| Order/ Judgment uploaded on | :- | 20/06/2026. |